# जिल्हा परिषद,अमरावती,सामान्य प्रशासन विभाग

**माहिती व संवाद कक्ष**

## जाहीर ई -निविदा सूचना क्रं. २

**Digital Content Creation, Short Film/Reels Production, Photography/Videography व Social Media Management करण्यासाठी बाह्य संस्थेची नियुक्ती**

जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या लोककल्याणकारी योजना, विकासकामे, विविध कार्यक्रम, जनजागृती उपक्रम तसेच जिल्हा परिषदेच्या कामकाजाची माहिती आधुनिक डिजिटल माध्यमाद्वारे नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने **Short Film/Reels निर्मिती, Video/Photography, Digital Content निर्मिती, Graphics , Video Editing तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत Social Media Accounts चे व्यवस्थापन** करण्यासाठी पात्र व अनुभवी बाह्य संस्था/एजन्सीची निवड करण्यात येणार आहे.

सदर उपक्रम **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या मार्गदर्शन, नियंत्रण व अंतिम मान्यतेखाली तसेच माहिती व संवाद कक्षामार्फत** राबविण्यात येईल.

सदर कामकाज महाराष्ट्र शासनाच्या लागू **Digital Media Advertising Guidelines, 2023,** शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना तसेच जिल्हा परिषदेस लागू असलेल्या वित्तीय व खरेदी विषयक नियमांच्या अधीन राहील.

**१. कामाचे नाव**

**"जिल्हा परिषद अमरावतीच्या विविध योजना, विकासकामे व शासकीय उपक्रमांच्या प्रचार-प्रसारासाठी Digital Content Creation, Short Film/Reels Production, Photography/ Videography व Social Media Management करण्यासाठी बाह्य संस्थेची नियुक्ती."**

**२. निधी व लेखाशीर्ष**

सदर उपक्रमासाठी आवश्यक खर्चाची तरतूद खालील लेखाशीर्षातून करण्यात येईल :-

**२५१५ / राष्ट्रीय पंचायत पुरस्कार १३-१०१-ईडिजिटल लायब्ररी व इतर / गव्हर्नन्स- योजना**

सदर लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादेत व संबंधित निधीच्या अनुज्ञेयतेनुसार खर्च करण्यात येईल.

**अंदाजित खर्च : रु. ७,००,०००/-**
**(अक्षरी रुपये सात लक्ष फक्त)**

सदर खर्चाची अनुज्ञेयता, निधीची उपलब्धता व लेखाशीर्षाचा वापर याबाबत वित्त विभागाच्या लागू नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

Scanned with Cam

## ३. कामाचा कालावधी

सदर कामाचा कालावधी **११ महिने** राहील.

कराराचा कालावधी संपल्यानंतर कामाची आवश्यकता, संस्थेचे समाधानकारक कामकाज, निधीची उपलब्धता व लागू नियमांच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे राहील.

## ४. दरमहा अपेक्षित किमान कामाचे प्रमाण

निवड झालेल्या संस्थेस दरमहा किमान खालीलप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील :-

| अ.क्र. | कामाचा प्रकार | दरमहा किमान प्रमाण |
|---|---|---|
| १ | Short Film / माहितीपट स्वरूपातील Video | २ |
| २ | Social Media Reels / Short Videos | 30 |
| ३ | Graphic/Post/Infographic | २० |
| ४ | विकासकामे कार्यक्रमांचे/Video/Photo Coverage | ४ कार्यक्रम |
| ५ | योजनांवरील Digital Awareness Content | ४ |
| ६ | Social Media Analytics व Monthly Report | १ अहवाल |

वरील प्रमाण **किमान अपेक्षित कामाचे प्रमाण** राहील.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा माहिती व संवाद कक्षामार्फत जनहिताच्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त Content तयार करण्याचे निर्देश दिल्यास संस्थेने ते करणे बंधनकारक राहील. मात्र, मंजूर आर्थिक मर्यादेपेक्षा अतिरिक्त आर्थिक दायित्व निर्माण होणार नाही.

## ५. कामाचे सविस्तर स्वरूप

निवड झालेल्या संस्थेस खालील कामे करावी लागतील :-

1. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या विकासकामांचे व योजनांचे Video व Photography करणे.
2. योजनांची माहिती देणारे Short Films व Reels तयार करणे.
3. लाभार्थी व नागरिकांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी माहितीपूर्ण Content तयार करणे.
4. कार्यक्रम, बैठका, लोकार्पण, उद्घाटन, पाहणी दौरे इत्यादींचे Coverage करणे.
5. Video Editing, Graphics, Animation, Infographics इत्यादी तयार करणे.
6. Facebook, Instagram, YouTube, X (Twitter) इत्यादी अधिकृत Social Media Platforms साठी Content तयार करणे.
7. माहिती व संवाद कक्षाच्या निर्देशानुसार Content मध्ये आवश्यक बदल करणे.
8. तयार केलेल्या सर्व Raw Footage व Final Digital Files जिल्हा परिषदेस उपलब्ध करून देणे.
9. Social Media Analytics चा मासिक अहवाल सादर करणे.
10. विविध योजनांच्या जनजागृतीसाठी Digital Campaign राबविणे.

Scanned with Cam

## ६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण

सदर उपक्रमाचे **प्रशासकीय नियंत्रण, मार्गदर्शन व अंतिम निर्णयाचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे राहतील.**

सदर कामकाजाचे दैनंदिन समन्वय, Content मागणी, माहिती संकलन, प्राथमिक छाननी, Social Media Monitoring, Analytics व संबंधित संस्थेशी समन्वयाची कार्यवाही **माहिती व संवाद कक्षामार्फत** करण्यात येईल.

**माहिती व संवाद कक्षामार्फत अधिकृतरीत्या निर्देश प्राप्त झाल्याशिवाय संस्थेस कोणतेही स्वतंत्र कामाचे आदेश ग्राह्य राहणार नाहीत.**

## ७. Social Media Accounts बाबत

1. जिल्हा परिषदेच्या अधिकृत Facebook, Instagram, YouTube, X (Twitter) व अन्य Social Media Accounts चे मालकी हक्क व अंतिम नियंत्रण जिल्हा परिषदेकडेच राहील.
2. संस्थेस आवश्यक तेवढाच तांत्रिक Access माहिती व संवाद कक्षाच्या नियंत्रणाखाली देण्यात येईल.
3. संस्थेस स्वतःच्या अधिकाराने कोणतीही Post/Reel/Video प्रकाशित करता येणार नाही.
4. प्रत्येक Content च्या प्रकाशनापूर्वी **मा मुख्य कार्यकारी .अधिकारी किंवा त्यांचेकडून** अधिकृत केलेल्या **अधिकाऱ्यांचीमाहिती व संवाद कक्षाची मान्यता/** घेणे बंधनकारक राहील.
5. संस्थेने Account Password, Recovery Email, Mobile Number अथवा Administrator Rights मध्ये कोणताही बदल पूर्वपरवानगीशिवाय करू नये.
6. करार समाप्त झाल्यानंतर संस्थेकडील सर्व Login/Access तत्काळ जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करणे बंधनकारक राहील.

## ८. Content संबंधी अटी व शर्ती

तयार करण्यात येणारा Content :-

1. तथ्यात्मक व अधिकृत माहितीवर आधारित असावा.
2. नागरिकांना सहज समजेल अशा मराठी भाषेत असावा.
3. कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा पक्षीय प्रचाराचा नसावा.
4. कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक प्रसिद्धी करणारा नसावा.
5. जातीय, धार्मिक, सामाजिक तेढ निर्माण करणारा नसावा.
6. खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती असू नये.
7. Copyright चे उल्लंघन करणारी सामग्री वापरता कामा नये.
8. शासनाच्या धोरणांना किंवा जिल्हा परिषदेच्या अधिकृत भूमिकेला बाधक नसावा.
9. कोणत्याही व्यक्तीचा फोटोव्हिडिओ वापरताना लागू कायदेशीर तरतुदी व आवश्यक संमतीचे पालन / .करावे
10. अश्लील, आक्षेपार्ह, द्वेषपूर्ण, भेदभाव करणारा किंवा समाजात गैरसमज निर्माण करणारा Content प्रसिद्ध करता येणार नाही.
11. कोणत्याही अनधिकृत संगीत, चित्रफिती, छायाचित्रे, लोगो किंवा इतर Copyright सामग्रीचा वापर करता येणार नाही.

Scanned with Cam

## ९. Content चा पूर्वमंजुरी

संस्थेने तयार केलेला प्रत्येक Short Film, Reel, Post, Graphic, Video किंवा अन्य Digital Content प्रथम **माहिती व संवाद कक्षाकडे** सादर करावा.

आवश्यक तथ्यात्मक व तांत्रिक तपासणीनंतर **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांचेकडून अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच** सदर Content अधिकृत Social Media Platform वर प्रकाशित करता येईल.

## १०. संस्थेची किमान पात्रता

निविदादाराकडे खालील पात्रता असणे आवश्यक राहील :-

1. संस्था.कंपनी कायदेशीररित्या नोंदणीकृत असावी/फर्म/
2. PAN व GST Registration असणे आवश्यक.
3. Digital Content/Video Production/Social Media Management क्षेत्रातील अनुभव असावा.
4. संबंधित क्षेत्रातील **किमान २ वर्षांचा अनुभव** असावा.
5. शासनस्थानिक स्वराज्य संस्था किंवा नामांकित संस्थेसाठी केलेल्या तत्सम कामाचा अनुभव /निमशासकीय/ .असल्यास प्राधान्य
6. पूर्वी कोणत्याही शासन स्थानिक स्वराज्य संस्थेकडून/Blacklist/Debar केलेले नसावे.
7. आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असावे.
8. आवश्यक Camera, Editing System, Audio Equipment व इतर साधनसामग्री उपलब्ध असावी.
9. पूर्वी केलेल्या कामाचे Portfolio सादर करणे आवश्यक राहील.

**आवश्यक मनुष्यबळ**

- Video/Camera Personnel
- Video Editor
- Graphic/Digital Content Designer
- Social Media Executive

## ११. अनुभव व कागदपत्रे

निविदादाराने खालील कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील :-

1. संस्था.फर्म नोंदणी प्रमाणपत्र/
2. PAN Card.
3. GST Registration Certificate.
4. मागील निर्धारित कालावधीचे Income Tax Returns.
5. CA प्रमाणित आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र.
6. तत्सम कामाचे Work Orders/Experience Certificates.
7. Portfolio.
8. मनुष्यबळाचा तपशील.

Scanned with Cam

9. तांत्रिक साधनसामग्रीचा तपशील.
10. Blacklisting नसल्याचे स्वघोषणापत्र.
11. अटी व शर्ती मान्य असल्याचे Undertaking.
12. गोपनीयता व माहिती सुरक्षेबाबत Undertaking.
13. आवश्यक Affidavit/प्रतिज्ञापत्र.
14. निविदा दस्तऐवजात नमूद केलेली इतर सर्व कागदपत्रे.

## १२. गोपनीयता व माहिती सुरक्षा

1. जिल्हा परिषदेकडून संस्थेस उपलब्ध करून दिलेली कोणतीही शासकीयगोपनीय माहिती तृतीय पक्षास देऊ / .नये
2. नागरिकांची वैयक्तिक माहिती, मोबाईल क्रमांक, कागदपत्रे किंवा संवेदनशील माहिती अनधिकृतपणे वापरता.प्रसारित करता येणार नाही/
3. जिल्हा परिषदेची माहिती स्वतःच्या व्यावसायिक वापरासाठी वापरता येणार नाही.
4. करार समाप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या माहितीची प्रत संस्थेकडे ठेवता येणार नाही, जोपर्यंत लेखी परवानगी दिलेली नसेल.

## १३. तयार Content चे हक्क

जिल्हा परिषदेच्या कामासाठी संस्थेने तयार केलेले—

**Photo, Video, Reel, Short Film, Graphics, Animation, Raw Footage, Source Files व Final Digital Content**

यांचा वापर करण्याचा अधिकार जिल्हा परिषद अमरावतीकडे राहील.

संस्थेने सदर सामग्री स्वतःच्या व्यावसायिक/प्रचारात्मक वापरासाठी जिल्हा परिषदेची पूर्वलेखी परवानगी घेतल्याशिवाय वापरता येणार नाही.

## १४. मासिक अहवाल व Analytics

संस्थेने प्रत्येक महिन्याला खालील अहवाल माहिती व संवाद कक्षास सादर करावा :-

- तयार केलेल्या Reels ची संख्या
- तयार केलेल्या Videos ची संख्या
- Graphic Posts ची संख्या
- कार्यक्रमांचे Coverage
- प्रकाशित Content
- Views
- Reach
- Engagement
- Followers/Subscribers मधील बदल
- Social Media Analytics
- पूर्ण.प्रलंबित कामाचा तपशील/

Scanned with Cam

**१५. देयक अदा करण्याची पद्धत**

मासिक काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यानंतर खालील कागदपत्रांच्या आधारे देयक अदा करण्यात येईल :-

**बिल + कामाचा तपशील + Content List + Digital Files/Links + Analytics Report + माहिती व संवाद कक्षाचे समाधान प्रमाणपत्र.**

लागू GST, TDS व इतर कर/कपाती नियमानुसार करण्यात येतील.

काम अपूर्ण/असमाधानकारक असल्यास संबंधित कामाचे देयक रोखण्याचा/कपात करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस राहील.

**१६. हमीपत्र/प्रतिज्ञापत्र**

निविदादाराने सादर केलेली सर्व माहिती खरी व अचूक असल्याबाबत तसेच निविदेतील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत अधिकृत स्वाक्षरीदाराचे **हमीपत्र/प्रतिज्ञापत्र** सादर करणे बंधनकारक राहील.

खोटी माहिती/बनावट कागदपत्रे आढळल्यास निविदा/करार रद्द करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१७. करार रद्द/निलंबित करण्याच्या अटी**

खालील बाबी आढळल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना करार निलंबित/रद्द करण्याचा अधिकार राहील :-

1. खोटी माहिती सादर करणे.
2. बनावट कागदपत्रे सादर करणे.
3. निकृष्ट दर्जाचे काम करणे.
4. निर्धारित वेळेत काम न करणे.
5. पूर्वपरवानगीशिवाय Content प्रकाशित करणे.
6. राजकीय पक्षीय/Content प्रकाशित करणे.
7. शासकीय माहितीचा गैरवापर करणे.
8. Social Media Account चा गैरवापर करणे.
9. Copyright चे उल्लंघन करणे.
10. गोपनीयतेचा भंग करणे.
11. जिल्हा परिषदेच्या प्रतिमेस बाधा आणणारे कृत्य करणे.
12. करारातील अटींचे उल्लंघन करणे.
13. संस्था Blacklist/Debar असल्याचे निदर्शनास येणे.

Scanned with Cam

## १८. निविदा प्रक्रिया

सदर कामासाठी निविदा प्रक्रिया **जिल्हा परिषदेस लागू असलेल्या प्रचलित शासन खरेदी नियमांनुसार ई-निविदा/लागू खरेदी प्रणालीद्वारे** राबविण्यात येईल.

**निविदा दोन भागांत सादर करावी :-**

**अ (Technical Bid**
वरील सर्व पात्रता व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.
**ब (Financial Bid**
निविदादाराने **११ महिन्यांच्या संपूर्ण कामासाठी सर्वसमावेशक आर्थिक दर** सादर करावा.
अंदाजित खर्च रु. ७.०० लाख हा ११ महिन्यांच्या कालावधीसाठी आहे.

## १९. निविदा निवडीची पद्धत

Technical Bid मध्ये पात्र ठरलेल्या निविदादारांच्याच Financial Bid चा विचार करण्यात येईल.

Technical Evaluation व Financial Evaluation ही प्रक्रिया जिल्हा परिषदेस लागू असलेल्या प्रचलित खरेदी नियमांनुसार करण्यात येईल.

केवळ कमी दर असणे हे निविदा स्वीकारण्याचे एकमेव निकष राहणार नाहीत. पात्रता, अनुभव, तांत्रिक क्षमता, Portfolio, मनुष्यबळ, कामाची गुणवत्ता व आर्थिक दर यांचा विचार लागू निविदा प्रक्रियेनुसार करण्यात येईल.

## २०. EMD व निविदा शुल्क

| | |
|---|---|
| **EMD : रु. 70000/** | **निविदा शुल्क : रु. 700/** |

वरील रक्कम जिल्हा परिषदेस लागू असलेल्या प्रचलित शासन खरेदी नियमांनुसार निश्चित करण्यात येईल.

## २१. निविदेचे प्राथमिक वेळापत्रक

| बाब | दिनांकवेळ/ |
|---|---|
| निविदा प्रसिद्धी दिनांक | 1/9/2026 |
| निविदा उपलब्ध होण्याचा दिनांक | 1/9/2026 |
| निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | 15/9/2026 |
| Technical Bid उघडण्याची तारीख | 15/9/2026 |
| Financial Bid उघडण्याची तारीख | 16/9/2026 |
| कामाचा आदेश | 19/9/2026 |

Scanned with Cam

## २२. अधिकार राखून ठेवणे

निविदा स्वीकारणे/नाकारण्याचा, निविदेतील अटींमध्ये आवश्यक ते बदल करण्याचा, निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा कोणतीही निविदा स्वीकारण्यास नकार देण्याचा अधिकार **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती** यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

याबाबत कोणत्याही निविदादारास नुकसानभरपाई/भरपाईचा दावा करता येणार नाही.

## २३. अंतिम प्रशासकीय नियंत्रण

सदर निविदा, कामाचे आदेश, Content मंजुरी, Social Media Publication, कामाची तपासणी, देयकासंबंधी प्रमाणपत्र, करारातील बदल/वाढ/कपात व इतर प्रशासकीय बाबींवरील **अंतिम अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे राहतील.**

सदर कामकाजाचे समन्वय व अंमलबजावणी **माहिती व संवाद कक्षामार्फत** करण्यात येईल.

### निविदेची संक्षिप्त माहिती

| बाब | तपशील |
|---|---|
| कामाचा कालावधी | ११ महिने |
| अंदाजित किंमत | रु . ७,००,०००-/ |
| निधीचे लेखाशीर्ष | २५१५ / राष्ट्रीय पंचायत पुरस्कार १३-१०१-ईडिजिटल लायब्ररी / गव्हर्नन्स- व इतर योजना |
| Short Film | दरमहा २ |
| Social Media Reels | दरमहा 30 |
| Graphic/Post/Infographic | दरमहा २० |
| कार्यक्रम Coverage | दरमहा ४ |
| Awareness Content | दरमहा ४ |
| Analytics Report | दरमहा १ |
| प्रशासकीय नियंत्रण | मामुख्य कार्यकारी अधिकारी . |
| कार्यवाहीसमन्वय/ | माहिती व संवाद कक्ष |
| खर्च प्रती महीना | संस्थेने ऑनलाइन BOQ मध्ये भरावयाचे रक्कम |

**स्थळ - : अमरावती**
**दिनांक :** ___________

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अमरावती

Scanned with Cam